भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०५/२०१७

**१) क्षुल्लक कारणावरून थापड बुक्यांने व काठीने मारून जखमी करून फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०५/२०१७ चे ०७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी श्रीचंद रामलाल लिल्हारे वय ६० वर्ष, रा. खमारी बुज यांचा जखमी मुलगा मंगेश श्रीचंद लिल्हारे वय ११ वर्ष यांची शेळी आरोपीच्या शेतातील लावलेल्या भेंडीचे वाडीवर गेली असतांना आरोपीने जखमीला थापड बुक्यांनी व डावे हातावर काठीने मारून दुखापत केल्याने डॉ. एमएलसी. रिपोर्ट व जखमीचे एक्सरे रिपोर्ट मध्ये जखमीच्या डावे हाताला फॅक्चर असल्याचे अहवाल प्राप्त झाल्याने पोस्टे. मोहाडी येथे कलम ३२५ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगळे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) संगनमत करून विटा अंगनात का ठेवले या कारणावरून भांडण, शिवीगाळ करून लोखंडी विळयाने ओरपडुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०५/२०१७ चे १०.०० ते ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी बिसन मोडकु सेलोकर वय ५९ वर्ष रा. माटोरा याने आरोपी क्र. १ यास अगंनात ठेवलेल्या विटा कोनाचे आहे. येथे विटा का ठेवले असे बोलल्या वरून आरोपी क. १ ने फिर्यादीचे सोबत भांडण करून दोन्ही गालावर लोखंडी विळयाने ओरपडले नंतर ओरोपी क्र. १ व २ नी संगनमत करून तु जादुखोर आहेस तु जादु करतेस असे बोलुन शिवीगाळ करून जिवाने मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोस्टे. कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) संगनमत करून क्रिकेट खेळण्याचे कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन स्टम्प काढुन डोक्यावर,हातावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०५/२०१७ ते १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी व जखमी शादाब आजम शेख वय १७ वर्ष रा. तकीया वार्ड भंडारा हे मित्रा सोबत क्रिकेट खेळत असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करून या ठिकाणी क्रिकेट खेळु नका असे म्हणुन गाडलेले क्रिकेटचे स्टम्प काढुन फिर्यादी व जखमी सोबत भांडण करून शिवीगाळ केली व आरोपी क. २ ने फिर्यादीचे पाठीवर व उजव्या हातावर व शादाब यास आरोपी क्र. १ ने त्याचे डोक्यावर उजव्या हातावर मारून दुखापत केल्याने फिर्यादी इम्रान खान खलील खान वय २० वर्ष, रा. अन्सारी वार्ड जुने गांधी विद्याल्याचे मागे भंडारा यांचे बयान व जखमीचे एमएलसी रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम ३२४,३२३,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) घराचे बांधकामावरून भांडण करून डोक्याचे मागचे बाजुला दगडाने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १६/०५/२०१७ ते १५.०० वा. दरम्यान यातील आरोपीने घराचे बांधकामा वरून फिर्यादी सोबत भांडण करून भांडणात आरोपीने फिर्यादीचे डोक्यावर मागचे बाजुला दगडाने मारून जखमी केल्याने फिर्यादी सौ. लक्ष्मी धनराज गेडाम वय ६४ वर्ष रा.पळसपाणी हमु. शिवशक्ती नगर मानेवाडा रोड तपस्या विद्या मंदीर नागपुर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पो.स्टे. साकोली येथे कलम ३२४,५०६, भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सौ. गोडंगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) अनोळखी ईसमाने एटीएम ची अदलाबदली करून पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोदं . :—

दिनांक १६/०५/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी प्रगती नानाजी कांबळे वय २० वर्ष रा. मुरमाडी/बारवा ही बॅक ऑफ इंडीया एटीएम साकोली मधुन पैसे काढण्यास गेली असता पैसे न निघाल्याने बाजुला असलेला आरोपी एक अनोळखी इसम यास एटीएम मधुन पैसे काढण्यास मदत मागीतीली असता अनोळखी इसम याने फिर्यादीचे पासवर्ड माहीती करून घेवुन आपल्या जवळील एटीएम फिर्यादीस देवुन व फिर्यादीचा एटीएम आपल्याकडे ठेवुन निघुन जावुन भंडारा एटीएम मधुन फिर्यादीचे एटीएम व्दारे फिर्यादीचे खात्यातुन ४०,०००/रू. विड्राल करून फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम ४२० भांदवि. सहकलम ६६ सीआयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये अवैधरित्या अपुऱ्या जागेत जनावरे निदर्यतेने कोंबुन,हयगयीने ट्रक चालवुन , वाहनाचे कागदपत्रे सोबत न बाळगता वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १६/०५/२०१७ चे २०.५० ते २१.३० वा. दरम्यान यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये अवैधरित्या जनावरे कोंबुन असल्याचे गोपनिय माहीतीचे आधारे तपासनी केली असता १८ नग बैल किंमती २,१६०००/रू. चा माल निदर्यतेने, हयगयीने त्यांना वाजविरित्या हालचाल करता येत नाही अशा अपुऱ्या जागेत यातील आरोपीतांनी कोंबुन ठेवुन त्यांचे ताब्यातील वाहन हयगयीने चालवुन वाहनाचे कागदपत्रे सोबत न बाळगल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. फुंडे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखांदुर येथे कलम २८९,३४ भांदवि. सहकलम ११ (१) (घ) (ड) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्याचा कायदा १९६० सहकलम ११९ मपोका. सहकलम १८४,१३९/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

७) अचानक प्रकृती बिघडल्याने औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :—

दिनांक १६/०५/२०१७ चे १३.४५ वा दर. यातील मृतक सौ. संगीता सचीन मारबते वय २२ वर्ष, रा. मौदी हीची प्रकृती बिघडल्याने तीला औषधपचारा करिता ग्रा.रू. अडयाळ येथे आणले असता तेथील डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरून व फिर्यादी नितीन जियालाल बिजवे वय ३८ वर्ष कक्ष सेवक ग्रा.रू. अडयाळ यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

८) रोजगार हमीच्या कामावर काम करित असतांना अचानक चक्कर आल्याने खाली पडुन महिलेचा मृत्यु . :—

दिनांक १६/०५/२०१७ चे ०९.३० वा दर. यातील मृतक श्रीमती मंजुळाबाई बेवा रतीराम राखडे वय ५५ वर्ष, रा. मोहगाव ही रोजगार हमीच्या कामावर काम करित असतांना अचानक चक्कर आल्याने ती खाली पडुन मरण पावल्याने फिर्यादी अशोक सदाराम शेंडे वय ४१ वर्ष रा.जांबळापाणी उपसरपंच यांचे लेखी रिपोर्ट वरुन पो.स्टे करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

९) अवैध दारु अडयावर धाडी . :—

दिनांक १६/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. तुमसर येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभट्टी दारु + ३०० किलो सडवा मोहा साहीत्य किंमती २०,५००/रु., असा एकुण किंमती २०,५००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहेत.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १६/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ११ तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.